बँक ऑफ महाराष्ट्र
Bank of Maharashtra
भारत सरकार का उद्यम
एक परिवार एक बँक

Marketing and Publicity Dept.,
Head Office, Lokmangal
1501, Shivaji Nagar, Pune 411 005
020- 25614324
cmmedia@mahabank.co.in

**~प्रसिद्धीसाठी~**

# बँक ऑफ महाराष्ट्र तर्फे सतर्कता जागरूकता सप्ताहाचे आयोजन

**पुणे, ऑक्टोबर 30, 2019:** देशातील सार्वजनिक बँकांमधील एक प्रमुख बँक ऑफ महाराष्ट्र तर्फे दिनांक 28 ऑक्टोबर ते 2 नोव्हेंबर 2019 दरम्यान 'सतर्कता जागरूकता सप्ताह' साजरा करण्यात येत आहे. बँकेच्या सर्व शाखा आणि अंचल कार्यालयांमध्ये हा सप्ताह 'प्रामाणिकपणा-एक जीवनशैली' या संकल्पनेवर आधारित साजरा केला जाणार आहे. केंद्रीय सतर्कता विभागाच्या मार्गदर्शक तत्वांनुसार या सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.

बँकेच्या सर्व उच्च पदस्थ, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी सचोटीची शपथ ग्रहण करून या सप्ताहाचा प्रारंभ केला. बँकेचे कार्यकारी संचालक श्री ए. सी. राउत यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून जोडल्या गेलेल्या देशभरातील विविध 32 अंचल कार्यालयाच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांना इंग्रजीमधून तर बँकेचे मुख्य सतर्कता अधिकारी श्री एल. एन. रथ यांनी हिन्दीतून शपथ दिली. माननीय राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, राज्याचे मंत्री आणि सतर्कता विभागाद्वारे प्राप्त झालेल्या संदेशांचे वाचन यावेळी करण्यात आले.

बँकेचे पुण्यामधील शहर अंचल, पुणे पश्चिम आणि पुणे पूर्व अंचलच्या कर्मचाऱ्यांची संयुक्त दुचाकी वाहन रॅलीचे आयोजनही यावेळी करण्यात आले होते. बँकेच्या मुख्य कार्यालयापाशी या रॅलीस कार्यकारी संचालक श्री ए. सी. राउत, कार्यकारी संचालक श्री हेमन्त टम्टा आणि मुख्य सतर्कता अधिकारी श्री एल. एन. रथ यांनी हिरवा झेंडा दाखवला. रॅलीमध्ये 'सचोटी' बाबतचे महत्व अधोरेखित करणारे विविध फलक कर्मचाऱ्यांच्या हाती होते. पुणे शहर अंचलचे प्रमुख श्री पी. आर. खटावकर, पश्चिम अंचल प्रमुख श्री पी. के. दाश, आणि सतर्कता विभागाच्या उप सरव्यवस्थापिका श्रीमती मृदुल जोगळेकर यांनी बँकेच्या कर्मचारी-अधिकाऱ्यांसह रॅलीमध्ये सहभाग घेतला.

या सप्ताहादरम्यान बँकेने देशभरातील 32 अंचल कार्यालयांमध्ये कार्यशाळा, संवेदीकरण कार्यक्रम, कर्मचाऱ्यांसाठी स्पर्धा, रॅली, बॅनर्स आणि होर्डिंगचे प्रदर्शन, विविध ग्रामपंचायतींमध्ये जागरूकता कार्यक्रम, 'प्रामाणिकपणा-एक जीवनशैली' या संकल्पनेवर आधारित विविध शाळा-महाविद्यालयांमध्ये कृतीकार्यक्रम, कर्मचारी आणि सर्वसामान्य नागरिकांसाठी ई-शपथ (संगणकाद्वारे शपथ ग्रहण करणे) आदी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. यासह या सप्ताहादरम्यान कार्यकृतीचा एक भाग म्हणून दिनांक 01 नोव्हेंबर 2019 शुक्रवारी सर्व शाखांमध्ये 'ग्राहक मेळावे' आयोजित केले जातील. बँकेच्या मुख्यालयी दिनांक 02 नोव्हेंबर, 2019 शनिवारी या सतर्कता जागरूकता सप्ताहाची समाप्ती करण्यात येईल.

बैंक ऑफ महाराष्ट्र
Bank of Maharashtra
भारत सरकार का उद्यम
एक परिवार एक बैंक


Marketing and Publicity Dept.,
Head Office, Lokmangal
1501, Shivaji Nagar, Pune 411 005
020- 25614324
cmmedia@mahabank.co.in


